www.rajdand.com
सातारा, बुधवार
03.01.2024
पृष्ठ : ४ | मुल्य : ४ | मार्गशीर्ष कृ.२२
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

सूर लागू दे
१२ जानेवारीला संपूर्ण महाराष्ट्रात


(पान २ वर)

# ट्रकचालकांचा संप मागे

## हिट अँड रन कायद्याबाबत केंद्र सरकारचं स्पष्टीकरण

**नवी दिल्ली :** नवीन हिट अँड रन कायद्याच्या विरोधात देशातील माल वाहतूकदार आणि ट्रक चालक संपावर गेले आहे. भारतीय न्यायिक संहिता २०२३ मध्ये दुरूस्ती केल्यानतंर हिट अँड रन प्रकरणात दोषी चालकाला ७ लाख रूपयांपर्यंत दंड आणि १० वर्षांपर्यंतच्या तुरूंगवासाची तरतूद करण्यात आली आहे. त्यापाश्वर्भूमीवर ट्रक चालकांनी संपाचं हत्यार उपसलं होतं. मात्र, केंद्र सरकारशी चर्चा केल्यानंतर अखिल भारतीय माल वाहतूक काँग्रेस संघटनेनं चालकांना कामावर रूजू होण्याचं आवाहन केलं असून संप मागे घेण्यात आला आहे.



अखिल भारतीय माल वाहतूक काँग्रेस संघटनेच्या प्रतिनिधींनी केंद्र सरकारशी चर्चा केली. या बैठकीनंतर गृहमंत्रालयाचे सचिव अजय भल्ला यांनी नवीन कायदा अद्याप लागू करण्यात आला नाही, अशी माहिती दिली.

अखिल भारतीय माल वाहतूक काँग्रेस संघटनेच्या प्रतिनिधींशी चर्चा करण्यात आली. नवीन कायदे अद्याप लागू करण्यात आलेले नाही. भारतीय न्यायिक संहिता १०६ (२) लागू करण्याआधी भारतीय माल वाहतूक काँग्रेस संघटनेशी चर्चा केल्यानंतर निर्णय घेतला जाईल. अखिल भारतीय काँग्रेस आणि सगळ्या चालकांना संप मागे घ्यावा, असं आवाहन अजय भल्ला यांनी केलं.

अखिल भारतीय माल वाहतूक काँग्रेस संघटनेचे अध्यक्ष मलकित सिंग यांनी म्हटलं, भारतीय न्यायिक संहिता १०६ (२) या कायद्यानुसार १० वर्षाची शिक्षा आणि दंड अद्याप लागू करण्यात आला नाही. चालकांनी कुठलीही काळजी करण्याची गरज नाही. हिट अँड रन कायदा लागू होऊ देणार नाही. कायदा लागू झाल्यास आमच्या मृतदेहांवरून सरकारला जावं लागेल. चालकांनी पुन्हा कामावर रुजू व्हावं.

दरम्यान, मागील दोन दिवसांपासून माल वाहतूकदार, टँकरचालकांचा संप सुरू असल्यानं इंधनापासून ते भाजीपाला आणि अत्यावश्यक गोष्टींचा पुरवठा थांबला होता. अनेक ठिकाणी पेट्रोलपंप इंधनाअभावी ओस पडले होते. तर, नागरिकांनी पेट्रोल पंपावर रांगा लावल्या होत्या. या संपाची धग तीव्र होत असताना केंद्र सरकारनं माल वाहतूकदारांच्या संघटनेला चर्चेसाठी बोलावलं. या चर्चेत संपाबाबत तोडगा काढण्यात आला.

# आधी अफवा नंतर पेट्रोल पंपांवर रांगा; सगळे सुरळीत



**पुणे :** राज्यात वाहनचालक आणि मालवाहतूकदारांनी संप पुकारला आहे. या संपाचा फटका राज्यातील अनेक भागांमध्ये पेट्रोल पंपांना बसला आहे. पुण्यात मात्र, याउलट चित्र आहे. संपामुळे मंगळवारी शहरातील पेट्रोल पंपांवर सकाळी नेहमीपेक्षा जास्त वाहनांची गदी दिसून आली. मात्र, दुपानंतर ही गदी ओसरली.

पुणे, पिंपरी-चिंचवड ही शहरे आणि ग्रामीण भागात एकूण ९०० पेट्रोल पंप आहेत. वाहनचालक आणि मालवाहतूकदारांच्या संपामुळे पेट्रोल पंप बंद राहणार अशी अफवा सोमवारी (ता.१) पसरली होती. त्यामुळे अनेक पंपांवर वाहनांच्या मोठ्या रांगा सोमवारी रात्री दिसून आल्या. या काही ठिकाणी एवढ्या मोठ्या होत्या की त्यामुळे अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी झाली. त्यानंतर पुणे पेट्रोल डिलर असोसिएशनने पंप बंद राहणार नसल्याचे जाहीर केले. त्यामुळे वाहनचालकांना सुटकेचा निःश्वास टाकला. पुण्यात मंगळवारी सकाळी पेट्रोल पंपांवर पुन्हा वाहनांची गदी काही प्रमाणात दिसून आली. पंप सुरूच राहिल्याने आणि पुरवठा सुरळीत असल्याने ही गदी दुपारनंतर ओसरण्यास सुरूवात झाली. पुण्यातील सुमारे ६० टक्के पेट्रोल पंपचालक हे स्वतःच्या टँकरमधून इंधनाची वाहतूकर करतात. यामुळे मालवाहतूकदारांच्या संपाचा फारसा फटका पुण्यात जाणवला नाही. पेट्रोल पंपांवर नेहमी तीन दिवस पुरेल एवढा साठा ठेवणे बंधनकारक असते. त्यामुळे पुरवठा कमी झाला तरी तो सुरळीत होईपर्यंत पंप सुरू राहू शकतात, अशी माहिती पुणे पेट्रोल डिलर असोसिएशनचे अध्यक्ष ध्रुव रूपारेल यांनी दिली.

# पुरंदर मतदार संघातील ३२ हजार बोगस

## सांगलीतील पलूस–कडेगावमधील मतदार असल्याची तक्रार

**पुणे :** पुरंदर विधानसभा मतदारसंघामध्ये सांगली जिल्ह्यातील ३२ हजार ३६६ बोगस मतदार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर बोगस मतदार वगळण्यासाठी जिल्हा प्रशासनाने स्वतंत्र पथक स्थापन केले आहे. बोगस मतदार वगळण्याची कार्यवाही सुरू झाली असून, मुदतीमध्ये जेवढी नावे वगळतील जातील, तेवढीच नावे वगळण्यात येतील, असे जिल्हा निवडणूक शाखेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पाश्वर्भूमीवर मतदार याद्या अद्ययावतीकरण कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. मतदारांची प्रारूप यादी जाहीर केल्यानंतर निवडणूक शाखेकडून त्यावर हरकती आणि सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार पुरंदर विधानसभा मतदारसंघात ३२ हजारांहून अधिक नावे सांगली जिह्यातील पलूस-कडेगाव मतदारसंघातील असल्याबाबत माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी निवडणूक विभागाच्या निदशर्नास आणून दिले होते. बोगस मतदारांची नावे तातडीने वगळण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली होती. या तक्रारीची जिल्हा निवडणूक शाखेकडून तपासणी करण्यात आली. त्यावेळी त्यामध्ये तथ्य असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे बोगस मतदारांची नावे वगळण्यासाठी स्वतंत्र पथक स्थापन करण्यात आल्याची माहिती निवडणूक शाखेकडून देण्यात आली.



निवडणूक शाखेकडून पुण्यातील विधानसभा मतदारसंघातील प्रांत अधिकारी, तहसीलदार, मतदान नोंदणी अधिकारी आणि सांगलीतील पलूस विधानसभा मतदारसंघातील संबंधित अधिकाऱ्यांचे विशेष स्वतंत्र पथक तयार करण्यात आले आहे. या पथकाकडून बोगस मतदारांशी संपर्क साधला जाईल. कोणत्या मतदारसंघात नाव हवे, याची विचारणा करून त्यानुसार कार्यवाही केली जाईल, असे निवडणूक शाखेच्या उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी सांगितले. मतदाराला पलूस किंवा पुरंदर यापैकी एका विधानसभा मतदारसंघात नाव ठेवता येणार आहे. दरम्यान, १७ जानेवारी रोजी अंतिम मतदार यादी जाहीर केली जाणार आहे. पुरंदर मतदार संघातील यादीबाबत उशिरा तक्रार आली असून, ३२ हजार ३६६ दुबार नावे रद्द करण्यासाठी प्रत्येक मतदाराला संपर्क साधून एकच मतदार संघातील नाव निश्चित करण्यासाठी परवानगी घ्यावी लागणार आहे. त्यामुळे संबंधित मतदारांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला, तरच ही नावे वगळली जाणार आहेत.

# पाणबुडी प्रकल्प सिंधुदुर्गातच होणार

## राज्य सरकारची ग्वाही

**सिंधुदुर्ग :** महाराष्ट्र सरकारने २०१८ च्या अथर्संकल्पीय अधिवेशनात महाराष्ट्रातील विविध भागाच्या पर्यटन विकासासाठी १ हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करणार असल्याची घोषणा केली होती. यांतर्गत सिंधुदुर्गात देशातील पहिली पाणबुडी उपलब्ध करून देण्यात येणार होती. सिंधुदुर्गातील वेंगुर्ले तालुक्यातील निवती रॉक येथे समुद्रविश्व पाहण्यासाठी हा प्रकल्प राज्य सरकार राबवणार होतं. परंतु, हा प्रकल्प आता गुजरातच्या द्वारका येथे होणार असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या. यावरून प्रचंड राजकीय गदारोळ झाला. राज्य सरकारच्या हलगर्जीपणामुळे हा प्रकल्प गुजरातला गेला अशी टीका विरोधकांनी केली. यावर आता सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी हा प्रकल्प सिंधुदुर्गातच होणार असल्याचं स्पष्ट केलं आहे. या पाश्वर्भूमीवर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पाणबुडी प्रकल्पासंदर्भात आज मंत्रालयात बैठक झाली असल्याची माहिती रविंद्र चव्हाण यांनी एक्स पोस्टद्वारे दिली.



रविंद्र चव्हाण म्हणाले, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पाणबुडी प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत वेंगुर्ला येथेच होणार. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रस्तावित पाणबुडी प्रकल्प हा जिल्ह्याच्या पर्यटन व विकासाला चालना देणारा प्रकल्प असून हा आमच्या शासनाचा महत्त्वकांक्षी प्रकल्प आहे. तसेच नियोजनानुसार कोणत्याही परिस्थितीत हा प्रकल्प वेंगुर्ला येथूनच कार्यान्वित होणार आहे. मात्र आपल्या राजकीय स्वार्थासाठी विरोधक या प्रकल्पाबाबत जाणूनबुजून गैरसमज पसरवत आहेत. या पाश्वर्भूमीवर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पाणबुडी प्रकल्पासंदर्भात आज मंत्रालयात बैठक झाली.

ह्या बैठकीत प्रस्तावित पाणबुडी प्रकल्पाची सद्यस्थिती व वस्तुस्थिती जाणून घेतली. या प्रकल्पासाठी आवश्यक निधीसाठी प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. पाणबुडी पर्यटन विकासासाठी मंजूर निधीपैकी काही निधी हा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे(एमटीडीसीकडे) वर्ग करण्यात आला आहे. या प्रस्तावित प्रकल्पासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही व सदर प्रकल्प सकारात्मक पूर्ण होण्याच्या दृष्टीने विभागाने तातडीने प्रयत्न करावेत असे निर्देश यावेळी उपस्थितांना दिले.या बैठकीला पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळच्या व्यवस्थापकीय संचालक श्रध्दा जोशी- शर्मा यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किशोर तावडे हे व्हर्च्युअल माध्यमातून उपस्थित होतेह्न, अशी माहितीही रविंद्र चव्हाण यांनी दिली.

पर्यटन पाणबुडी प्रकल्प आपल्या राज्याचा आहे, जो आपल्या राज्यातून बाहेर जाणार नाही, याची तुम्ही खात्री बाळगा. यासह आपल्या राज्यात इतरही मोठे प्रकल्प सुरू होत आहेत. एमटीएचएल प्रकल्पाचं येत्या १२ जानेवारीला उद्घाटन होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या २२ किलोमीटर लांबीच्या सिंगल लाँगेस्ट ब्रीजचं (सर्वात लांब पूल) उद्घाटन होणार आहे. त्यामुळे २ तासांचं अंतर १५ मिनिटांवर येणार आहे. यासह वेळेची आणि इंधनाची बचत होईल. प्रदूषणही कमी होईल. हा एक गेमचेंजर प्रकल्प असेल. या प्रकल्पामुळे नवी मुंबईजवळ महामुंबई तयार होईल. तिकडे मोठ्या प्रमाणावर विकास होईल. आपल्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही दिवसांपूवी दिली होती.

नेमकं प्रकरण काय?

सिंधुदुर्ग जिल्ह्यात पहिले पर्यटन पाणबुडी प्रकल्प राबवण्यात येणार असल्याची घोषणा २०१८ मध्ये महायुती सरकारच्या काळात झाली होती. तत्कालीन पर्यटन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी अथर्संकल्पीय अधिवेशनात याबाबत जाहीर घोषणा केली होती. त्यानंतर, महाविकास आघाडी सरकारच्याही काळात या पाणबुडी प्रकल्पाविषयी घोषणा करण्यात आली. परंतु, पाचपेक्षा जास्त वर्षे उलटून गेल्यानंतरही या प्रकल्पाची फाईल पुढे सरकलेली नाही. दरम्यान, गुजरातमध्ये पहिला पाणबुडी प्रकल्प राबवण्यात येणार असल्याचे वृत्त काही प्रसिद्धी माध्यमांनी दिले होते.

# पुण्यात सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्यास आता ५०० रुपये दंड

## महापालिकेचा प्रस्ताव; सध्या १८० रुपये दंडाची तरतूद

**पुणे : सार्वजनिक ठिकाणी, पदपथ आणि रस्त्यांवर कचरा टाकणाऱ्यांना जरब बसावी, यासाठी दंडाची रक्कम वाढविण्याचा प्रस्ताव महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने तयार केला आहे. त्यानुसार दंडाची रक्कम ५०० रुपये करण्यात आली आहे. यापूर्वी उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांना केवळ १८० रुपयांचा दंड आकारला जात होता. मात्र दंडाच्या रकमेत वाढ केल्याने सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याचे प्रकार थांबतील, असा दावा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे.**

घनकचरा व्यवस्थापन विभागाचा हा प्रस्ताव अतिरिक्त आयुक्तांच्या मान्यतेनुसार आयुक्त कार्यालयाकडे पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर स्थायी समिती आणि मुख्य सभेच्या मान्यतेनंतर राज्य शासनाकडे तो पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर या प्रस्तावाची अंमलबजावणी होणार आहे. मात्र, दंडाची रक्कम वाढविल्यानंतरही सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याचे प्रकार थांबण्याची शक्यता कमीच आहे.

सार्वजनिक ठिकाणी, पदपथांवर, उघड्यांवर कचरा टाकणाऱ्यांविरोधात महापालिकेकडून दंडात्मक कारवाई केली जाते. उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांना सध्या नियमानुसार १८० रुपयांचा दंड आकारला जातो. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, लघुशंका करणे, थुंकणे, कचऱ्याचे वर्गीकरण न करणे, कचरा जाळणे, प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर, ओला कचरा जिरविण्यासाठी बल्क वेस्ट यंत्रणा कार्यान्वित न ठेवणे



आदींसाठी हा दंड केला जातो. दंडाची रक्कम पूवी शासन मान्यतेने निश्चित करण्यात आली आहे. त्यात कालानुरूप वाढ झालेली नाही. त्यामुळे दंडाच्या रकमेत वाढ करण्यात आली असून, यापुढे १८० रुपयांऐवजी ५०० रुपयांचा दंड आकारण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

दंडाची रक्कम कमी असल्याने उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांचे प्रमाण वाढत असून, त्यांना जरब बसत नाही. कचरा टाकताना सापडल्यास १८० रुपये भरून नागरिक मोकळे होतात. त्यामुळे दंड रक्कम वाढत असली, तरी शहर अस्वच्छ राहण्याचे प्रमाण कायम राहत आहे. महापालिकेच्या प्रस्तावानुसार दंडाच्या रकमेत वाढ होणार असली, तरी ही रक्कमही फार मोठी नाही. त्यामुळे कचरा टाकण्याच्या प्रकारांना आळा बसण्याची शक्यताही कमीच असल्याचे दिसत आहे.

सार्वजनिक ठिकाणी, उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांना १८० रुपये दंड केला जातो. ही रक्कम पूर्वीच निश्चित करण्यात आली होती. अशा प्रकारांना आळा बसावा, यासाठी अशा प्रकरणात प्रत्येकी ५०० रुपये दंड आकारण्यात यावा, असा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने तयार केला आहे. शासनाच्या मान्यतेनंतर सुधारित दंड आकारला जाईल.

**-डॉ. कुणाल खेमनार,**
अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका

# पिंपरीत चोरीचे दागिने स्वीकारणाऱ्या तीन सराफा व्यावसायिकांवर मोक्का

## ५१ टोळ्यांतील ३५७ गुन्हेगारांवर कारवाई

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड पोलिसांनी चोरीचे दागिने स्वीकारणाऱ्या तीन सराफा व्यावसायिकांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) कारवाई केली आहे. याबरोबरच १२ संघटीत गुन्हेगारी टोळ्यामधील ६० आरोपींवर करत ह्यमोक्काह्न कारवाईचे अर्धशतक पूर्ण केले. २०२३ मध्ये ५१ टोळ्यांतील ३५७ गुन्हेगारांवर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या आदेशाने कारवाई केली.



दर्शन रमेश पारेख ( वय ३२), गणपत जवाहरलाल शर्मा (वय ४४) आणि सुरजभान सिध्दराम अगरवाल (वय ७८, तिघे रा. खडकी) अशी कारवाई केलेल्या सराफा व्यावसायिकांची नावे आहेत. वाकड मधील टोळी प्रमुख रोहन ऊर्फ गंग्या वासुदेव वाघमारे ( वय २८) चाकण मधील शुभम युवराज सरोदे ( वय २१), निगडीतील आरोपी मोहम्मद ऊर्फ मम्या मेहबूब कोरबू (वय २८) पिंपरीतील प्रकाश ऊर्फ डब्बल सुरेंद्र राम (वय ३०), आकाश ऊर्फ जिलब्या यादव गायकवाड (वय २६), सांगवीतील आनंद सुनिल साळुंके उर्फ लोहार (वय १९), अक्षय ऊर्फ जोग्या हेमंत जाधव ( वय २५), निगडीतील लखन ऊर्फ बबलू अवधुत शर्मा (वय १९), भोसरीतील अक्षय नंदकिशोर गवळी (वय २८), चिखलीतील मन्नू ऊर्फ अतिष बलदेव कोरी ( वय २१) हे सर्व टोळी प्रमुख आणि त्यांच्या साथीदारांवर गंभीर गुन्हे दाखल आहेत.

आरोपींनी अवैध मार्गाने आर्थिक फायदा मिळवण्याचे उद्देशाने स्वतःचे गुन्हेगारी वर्चस्व व दहशत प्रस्थापित ठेवण्यासाठी संघटित गुन्हेगारी टोळी तयार केली होती. टोळी प्रमुख म्हणून हिंसाचाराची धमकी देवून किंवा धाक दपटशहा दाखवुन टोळी प्रमुख व साथीदार यांनी खून, खूनाचा प्रयत्न, सदोष मनुष्यवध करण्याचा प्रयत्न करणे, दरोडा, जबरी चोरी,अप्रमाणिकपणे चोरीची मालमत्ता स्वीकारणे, तोडफोड करणे, विनयभंग, अपहरण, खंडणी, दरोडा, दंगा करणे, अश्लिल वर्तन करणे, जिवे ठार मारण्याची धमकी देणे, बेकायदेशीररित्या घातक शस्त्रे जवळ बाळगणे असे अनेक गंभीर गुन्हे या सर्वांवर दाखल आहेत. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या आदेशानुसार शहरातील विविध पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली आहे.

# हडपसरमधील कालव्यात दोन मृतदेह सापडले

पुणे : हडपसर भागातील कालव्यात दोन मृतदेह सापडले. वाहून आलेल्या मृतदेहाची ओळख पटलेली नाही. वैदुवाडी भागातील रहिवाशांनी कालव्यात दोन मृतदेह तरंगत असल्याचे सोमवारी रात्री पाहिले आले. त्यांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. त्यानुसार हडपसर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

अग्निशामक दलाचेही पथक तेथे पोहोचले. अग्निशमन दलातील जवानांनी दोन्ही मृतदेह पाण्याबाहेर काढले. वैद्यकीय तपासणीसाठी दोन्ही मृतदेह ससून रुग्णालयात पाठवण्यात आले. दोघांची नेमकी ओळख पटलेली नाही. शहरातून बेपत्ता असलेल्या व्यक्तींच्या नोंदीवरून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. हडपसर पोलीस याप्रकरणी तपास करत आहेत.

अग्निशामक दलाचेही पथक तेथे पोहोचले. अग्निशमन दलातील जवानांनी दोन्ही मृतदेह पाण्याबाहेर काढले. वैद्यकीय तपासणीसाठी दोन्ही मृतदेह ससून रुग्णालयात पाठवण्यात आले. दोघांची नेमकी ओळख पटलेली नाही. शहरातून बेपत्ता असलेल्या व्यक्तींच्या नोंदीवरून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. हडपसर पोलीस याप्रकरणी तपास करत आहेत.

# उग्रवादाला मूठमाती

केंद्र सरकार आणि आसाम सरकारने २९ डिसेंबर रोजी युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसम (उल्फा) सोबत एक करार केला आहे. ईशान्येकडील शांतता प्रस्थापित करण्याच्या दिशेने हे एक मोठे पाऊल आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत उल्फा अतिरेक्यांनी आसाम सरकारसोबत शांतता करारावर स्वाक्षरी केली. आसाममध्ये अनेक दिवसांपासून उल्फा हिंसाचाराने ग्रासले होते. १९७९ पासून दहा हजार लोकांना प्राण गमवावे लागले आहेत. आसाममधील सर्वात जुनी अतिरेकी संघटना असलेल्या उल्फाने हिंसाचार सोडून संघटना बरखास्त करण्याचे मान्य केले आहे. ह्यउल्फाह्ण ही आसाममधील सक्रिय दहशतवादी संघटना आहे. ही संघटना सात एप्रिल १९७९ मध्ये परेश बरुआ आणि त्यांचे साथीदार अरबिंदा राजखोवा, गुलाब बरुआ उर्फ अनुप चेतिया, समीरन गोगोई उर्फ प्रदीप गोगोई आणि भद्रेश्वर गोहेन यांनी स्थापन केली होती. आसामला स्वायत्त आणि सावभौम राज्य बनवण्याचा त्यांचा उद्देश होता. या संघटनेने अनेक हल्ले केले. ३१ डिसेंबर १९९१ रोजी उल्फा कमांडर-इन-चीफ हिरक ज्योती महल याच्या मृत्यूनंतर सुमारे नऊ हजार उल्फा सदस्यांनी आत्मसमर्पण केले. या घटनेनंतर जवळपास १७ वर्षांनी २००८ मध्ये उल्फा नेता अरबिंदा राजखोवा याला बांगला देशातून अटक करण्यात आली होती. नंतर त्याला भारताच्या ताब्यात देण्यात आले. या संघटनेवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकार १९९० पासून प्रयत्न करत आहे. अनेकवेळा लष्करी कारवाया करूनही त्यात यश आले नव्हते. ह्यउल्फाह्णचा दहशतवाद आसाममध्ये शिगेला पोहोचला होता. आसाममधील अनेक चहाचे व्यापारी आसाम सोडून गेले होते. या व्यापाऱ्यांना सतत धमक्या येत होत्या. त्यांच्याकडून खंडणीची मागणी करण्यात आली. अनेक व्यावसायिकांच्या हत्येनंतर परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. राज्य आणि निमलष्करी दलाच्या कारवाईनंतरही दहशतवाद्यांना आळा घालता आला नाही. शांतता प्रस्थापित करण्यासाठी दोन्ही बाजूंनी प्रयत्न करण्यात आले. चर्चेच्या अनेक फेऱ्यांनंतर शांतता करारावर स्वाक्षरी करण्यासाठी एक करार झाला आहे. उल्फाने १९९० मध्ये सुरेंद्र पॉल नावाच्या चहा व्यापाऱ्याची हत्या केली. त्यामुळे संपूर्ण परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. पुढच्याच वषी १९९१ मध्ये एका रशियन अभियंत्याचे अपहरण करून हत्या करण्यात आली. २००८ मध्ये उल्फाने मोठा हल्ला केला. तीस ऑक्टोबर रोजी एकूण १३ बॉम्बस्फोट झाले. हे स्फोट किती मोठे होते याचा अंदाज या हल्ल्यांमध्ये ७७ जणांचा मृत्यू झाला यावरूनच लावता येतो.

ईशान्येकडील शांतता करारासाठी उल्फासोबत हा करार करण्यात आला. परेश बरुआ यांच्या नेतृत्वाखालील उल्फाचा कट्टरपंथी गट या कराराचा भाग नाही. सरकारने प्रस्तावित केलेल्या करारात सामील होण्यास नकार दिला आहे. आसाममधील लोकांचा सांस्कृतिक वारसा अबाधित राहील, आसाममधील लोकांसाठी राज्यात आणखी चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, सरकार उल्फाच्या कार्यकर्त्यांना रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध करून देईल, सशस्त्र चळवळीचा मार्ग सोडलेल्या ह्यउल्फाह्ण सदस्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भारत सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल, हे करारातील महत्त्वाचे मुद्दे आहेत. उल्फासोबत झालेल्या करारावर गृहमंत्री अमित शाह म्हणाले, की आसामच्या भविष्यासाठी हा उज्ज्वल दिवस आहे. राज्य आणि उत्तर-पूर्व भागात गेल्या अनेक दशकांपासून हिंसाचार होत आहे. नरेंद्र मोदी सत्तेत आल्यापासून आम्ही ईशान्येला हिंसामुक्त करण्याचा प्रयत्न करत आहोत. गेल्या पाच वर्षांत, ईशान्येमध्ये नऊ शांतता करारांवर (सीमा शांतता आणि शांतता करारांसह) स्वाक्षऱ्या झाल्या. आसाममधील ८५ टक्के भागातून अफ्सा हटवण्यात आला. आसाममधील हिंसाचार त्रिपक्षीय कराराद्वारे सोडवला जाऊ शकतो. आसाममधील दहशतवादावर हा उपाय आहे. करारातील सर्व कलमांची कालबद्ध पद्धतीने अंमलबजावणी केली जाईल. ह्यउल्फाह्णच्या सातशे कार्यकर्त्यांनी आत्मसमर्पण केले. या करारासाठी ह्यउल्फाह्णचे वीस नेते आठवडाभर दिल्लीत तळ ठोकून होते. केंद्र सरकार आणि आसाम सरकारचे उच्च अधिकारी स्वाक्षरीसाठी या कराराचा मसुदा तयार करत होते. उल्फाच्या एका गटाने शांतता करारावर स्वाक्षरी केली आहे. ह्यउल्फाह्णच्या एका गटाने २०११ पासून शस्त्र हाती घेतलेले नाही; परंतु औपचारिक शांतता कराराचा मसुदा तयार करण्याची ही पहिलीच वेळ आहे आणि दोन्ही बाजूंच्या प्रतिनिधींनी त्यावर स्वाक्षरी केली आहे. ईशान्येतील सशस्त्र दहशतवादी संघटनांसोबत भारत सरकारचा या वर्षातील हा चौथा मोठा करार आहे. केंद्र सरकारला उल्फाशी अनेकदा चर्चा करायची होती; मात्र ह्यउल्फाह्णमधील अंतर्गत भांडणामुळे या प्रयत्नात अडथळे येत राहिले. २०१० मध्ये ह्यउल्फाह्ण दोन भागात विभागला गेला. एका भागाचे नेतृत्व अरबिंदा राजखोवा करत होते, जे सरकारशी चर्चेच्या बाजूने होते आणि दुसऱ्या भागाचे नेतृत्व बरुआ यांच्याकडे होते. ते चर्चेच्या विरोधात होते. ह्यउल्फा,ह्य केंद्र आणि राज्य सरकार यांच्यात सस्पेंशन ऑफ ऑपरेशन्स करार झाल्यानंतर राजखोवा गट तीन सप्टेंबर २०११ रोजी सरकारसोबत शांतता चर्चेत सामील झाला.

आसाममध्ये अनेक दशकांपासून पसरलेले दहशतवाद, हिंसाचार आणि भीतीचे वातावरण संपवणे हा या कराराचा उद्देश आहे. अनेक वर्षांपासून, हजारो उल्फा कॅडर आणि देशाच्या सुरक्षा दलांमध्ये हिंसक संघर्ष सुरू आहे. यामध्ये सुरक्षा दलाच्या जवानांसह हजारो सामान्य नागरिकांचा बळी गेला आहे. केंद्र सरकार गेल्या एक वर्षापासून या शांतता करारावर काम करत होते आणि उल्फाचे बडे नेते आणि सरकारचे वरिष्ठ अधिकारी यांच्यात चर्चा सुरू होती. या शांतता करारानंतर आसाम उल्फाच्या दहशतीपासून पूर्णपणे मुक्त होईल का, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. आसाम ही मुळात अनेक छोट्या जमातींची भूमी होती. १८२६ मध्ये ह्यईस्ट इंडिया कंपनीने आदिवासी गटांच्या घराणेशाहीचा पराभव करून आसाम ताब्यात घेतला. त्यानंतर १८७४ मध्ये आसाम हा वेगळा प्रांत बनला. तेव्हा त्याची राजधानी शिलाँग होती. देश स्वतंत्र झाला आणि आसाम हे भारताचे राज्य बनले. आसाममधील लोक आदिवासी, बिगर आदिवासी आणि अनुसूचित जाती या तीन श्रेणींमध्ये विभागले गेले आहेत. १९७९ मध्ये आसाममध्ये बंडखोरी सुरू झाली. बंडखोरीमागे मोठी मागणी आहे. ही मागणी आसामला वेगळा देश करण्याची होती. त्याच्या केंद्रस्थानी होती उल्फा. परेश बरुआ आणि राजीव राजकंवर उर्फ अरबिंदा राजखोवा यांनी तयार केले आहे. परेश हा उल्फाच्या लष्करी शाखेचा कमांडर होता. त्याच्यासोबत इतर काही लोकही होते. हे लोक माओवादी विचारसरणीचे अनुयायी होते. आसाम हा कधीच भारताचा भाग नव्हता, असे उल्फाने म्हटले आहे. आसामला भेडसावत असलेली सर्वात मोठी समस्या म्हणजे त्याच्या राष्ट्रीय अस्मितेची समस्या. त्यामुळेच सार्वभौम आसाम निर्माण करणे हे उल्फाचे ध्येय होते. म्हणजे वेगळा देश. १९७९ मध्येच, ऑल स्टुडंट्स आसाम युनियन म्हणजेच आसूची स्थापना केली गेली. तिने बेकायदेशीर स्थलांतरितांच्या विरोधात चळवळ सुरू केली. १९८७ मध्ये आसूने बोडो जमातीसाठी स्वतंत्र 'बोडोलँड' या मागणीसाठी आंदोलन सुरू केले.

**भागा वरखडे**

## ६ जानेवारी पत्रकार दिनी वैद्यकीय तपासणी शिबीराचे आयोजन

**ठाणे :** ठाणे जिल्हा पत्रकार संघ, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ, ठाणे जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय व ठाणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत वैद्यकीय शिबिराचे आयोजन केले आहे.

दि.०६ जानेवारी २०२४ रोजी पत्रकार दिनाचे औचित्य साधून वैद्यकीय तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले असून पत्रकार बंधूभगिनींसह त्यांच्या कुटुंबियांनी या शिबिराचा लाभ घ्यावा. आधाररेखा प्रतिष्ठान, cancer patients Aids Association, Mahalaxmi, Mumbai यांच्या सहकार्याने अद्यावत पध्दतीद्वारे तपासणी केली जाईल.

या वैद्यकीय तपासणी मध्ये कर्करोग निदान तपासणीही होणार आहे. १) रक्त तपासणी २) नाक-कान-घसा तपासणी ३) स्त्रीरोग तज्ज्ञांकडून स्त्रियांची तपासणी ४) फिजीशियन कडून पुरुषांची तपासणी ५) व्यसनासंबंधी जागरुकता मुख्यत्वे या गोष्टी आहेत. शिबीरानंतर प्रत्येकाला रिपोर्ट दिला जाईल.

एकाचवेळी होणारी गर्दी टाळण्यासाठी आपले नाव नोंदवून दिलेल्या वेळेत उपस्थित रहावे. वेळ : सकाळी ९:३० ते दुपारी २:०० ठिकाण : नरेन्द्र बल्लाळ सभागृह , १ ला मजला, मुख्यालय ठाणे महानगर पालिका, पांचपाखाडी, ठाणे. प. नोंदणीसाठी संपर्क: १)संजय पितळे २) आनंद कांबळे ३)दीपक दळवी ४) दिलीप शिंदे

## तुलसी रामायणातील राम या विषयावर प्रकाश एदलाबादकर यांचे व्याख्यान

**नागपूर :** प्रभू रामचंद्र हे देशातील प्रत्येक भारतीयाचे दैवत आहे. अशा प्रभू रामचंद्राचे त्याच्या जन्मस्थानी म्हणजेच अयोध्येत भव्य मंदिर उभारले गेले असून त्याचे लोकार्पण येत्या २२ जानेवारी २०२४ रोजी उत्साहात केले जाणार आहे.

या निमित्ताने संपूर्ण देशात उत्साहाचे वातावरण आहे. या निमित्ताने देशात १जानेवारी ते १४ जानेवारी २०२४ या दरम्यान ठीकठिकाणी धार्मिक वैचारिक आणि सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून जनजागरण केले जाणार असून प्रभू रामचंद्राप्रती आपली श्रद्धा व्यक्त केली जात आहे.

अखिल भारतीय साहित्य परिषद विदर्भ प्रांताच्या वतीनेही या निमित्ताने विदर्भाच्या अकराही जिल्ह्यांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. या कार्यक्रमांमधून साहित्यातील राम ही संकल्पना ठेवून जनसामान्यांना संदेश दिला जाणार आहे.

याच कार्यक्रमांच्या मालिकेत अखिल भारतीय साहित्य परिषदेची नागपूर जिल्हा शाखा आणि श्री जगदंबा देवस्थान समिती, अत्रे लेआउट, राणा प्रताप नगर, यांच्या संयुक्त विद्यमाने एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. रविवार दिनांक ७ जानेवारी रोजी सायंकाळी पाच वाजता श्री राजराजेश्वरी सभागृह, श्री राजराजेश्वरी मंदिर, अत्रे लेआउट, राणा प्रताप नगर, नागपूर येथे साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रकाश एदलाबादकर यांचे ₹तुलसी रामायणातील राम₹ या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. डॉ .पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. अ.भा. साहित्य परिषद विदर्भ प्रांत अध्यक्ष आणि ख्यातनाम साहित्यिक एड. लखनसिंह कटरे हे देखील यावेळी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भारतीय साहित्य परिषद विदर्भ प्रांत कार्याध्यक्ष अविनाश पाठक, संघटन मंत्री एड. सचिन नारळे, नागपूर जिल्हा अध्यक्ष डॉ. सुरुची डबीर, श्री जगदंबा देवस्थान समितीचे अध्यक्ष दिनकरराव जोशी, सचिव चंद्रकांत शाह प्रवृत्तींनी केले आहे.

## अखिल भारतीय ग्रामीण साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन

**पुणे :** विचारवंत आणि साहित्यिकाच्या दुर्लक्षपणामुळे शेतकऱ्यांची दुदर्शा - श्रीपाल सबनीस भारत हा कृषिप्रधान देश आहे. देशाची संस्कृती ही शेतकऱ्यांपासून सुरू होते. देश समृद्ध करण्यामध्ये शेतकऱ्यांचे योगदान मोठे आहे. साहित्य संस्कृती याचा पाया हा कृषी संस्कृती मधून सुरू झाला असून या वैभवशाली संस्कृतीचे जनक शेतकरी सध्या आपले जीवन हे दुर्दैवी पद्धतीने जगत आहेत . एकेकाळचा शेतकरी राजा हा सध्या वेटबिगारीने गांजला आहे. हे अत्यंत चिंताजनक आहे याला कारणीभूत देशातील साहित्यिक व विचारवंत असल्याचे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले .

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित एकोणिसाव्या अखिल भारतीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ .सबनीस हे बोलत होते. यावेळी साहित्य संमेलनाचे उद्घाटन शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विठ्ठलराजे पवार यांच्या हस्ते झाले.यावेळी व्यासपीठावर अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे, राष्ट्रीय खजिनदार फुलचंद नागटिळक, स्वागत अध्यक्ष सुहास पाटील - जामगावकर ,निमंत्रक अनिलकुमार अनुभुले,



जिल्हाध्यक्ष प्रा. पंडितराव लोहोकरे, शहराध्यक्ष शाहीर रमेश खाडे, जिल्हा कार्याध्यक्ष रामप्रभू माने, ज्येष्ठ कवी देवेंद्र आवटी, कृषी तज्ञ शरदराव पाटील,ज्येष्ठ कवी माधव पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आली. दुपारी बारा ते दोन या सत्रांमध्ये कवी संमेलन संपन्न झाले. या कवी संमेलनासाठी ८३ ग्रामीण कवींनी सहभाग घेतला होता. या कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी कवी देवेंद्र औटी हे होते.त्या नंतर परिसंवादाचे आयोजन ही करण्यात आले होते . प्राध्यापक सुवर्णा गुंड यांच्या अध्यक्षतेखाली हा परिसंवाद संपन्न झाला. सायंकाळच्या सत्रांमध्ये कवी, लेखक, साहित्यिक, फुलचंद नागटिळक यांनी नटसम्राट हे एकपात्री नाटक सादर केले. या नाट्यप्रयोगानंतर संमेलनाची सांगता करण्यात आली.

संमेलनातील प्रमुख मुद्दे -शेतकऱ्यांना का भारतरत्न नाही?आज पर्यंत एकाही शेतकऱ्याला महाराष्ट्र भूषण महाराष्ट्र भूषण ,भारतरत्न यासारख्या प्रतिष्ठित सन्मानाने सन्मानित करण्यात आले नाही. मग हा देश कृषीप्रधान कसा? देशात ९७% कृषी संस्कृती असताना अभ्यासक्रमात मात्र तीन टक्के समावेश आहे, हे विदारक चित्र बदलणे गरजेचे आहे असे मत शरद गोरे.

राज्यपाल नियुक्त आमदार कोट्यामध्ये साहित्यिक व कृषी क्षेत्रामधून प्रतिनिधी निवडताना साहित्यक शरद गोरे यांना संधी देण्यात यावी. राज्यपालांनी कॅंडिडेट निवडताना साहित्य आणि कृषी संस्कृतीला प्राधान्य देणे गरजेचे आहे तरच साहित्यिक आणि शेतकऱ्यांना न्याय मिळेल. असे मत ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबमिस यानी मांडले.

## स्वामिनी सिंगीग ॲकॅडमीचा बहारदार गाण्यांचा नजराणा सादर





**पुणे :** सुप्रसिद्ध अभिनेत्री पुष्पा चौधरी यांच्या स्वामिनी सिंगीग ॲकॅडमी, वारजे पुणे मधिल सर्व गायक कलाकारांनी मराठी व हिंदी गाण्यांचा धमाका हा बहारदार गाण्यांचा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात अतिशय उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा केला.

कार्यक्रमाची सुरुवात सौ.मनिषा कसबे यांनी...ये मालिक तेरे बंधे हम...या प्राथर्नेने केली.नवोदित गायिका सौ.हेमलता मोडक यांनी...विसरु नको श्रीरामा मला...हे गीत गायल.तर ...बाबुजी धिरे चल ना...म्हणत मधुबाला यांनी स्टेज वर एंट्री केली...नैनोमे बदरा छांये... हे सुंदर गाणं माधुरी यांनी गायल.गणेश पंडित यांनी... फुलोंकी रंगसे...तर लिखेजो खत तुझे...म्हणत मंगेश पवार यांनी रसिकांची मने जिंकली.मेरा दिल ये पुकारे आजा...हे रुखसार हिने गावुन जुण्या आठवणी ताज्या केल्या.विशेष म्हणजे पुष्पा मॅडम आणि त्यांचे मोठे बंधू श्री.मधुसुधन पाठक यांनी...आदमी मुसाफिर है...म्हणत वन्स मोअर घेतला.संगीत शिक्षक श्री.संजय मरळसर आणि पुष्पा मॅडम यांनी... प्रीतीच झुळ झुळ पाणी...गाण गात कार्यक्रमाला रंगत आणली.बदन पे सितारे...हे मिलिंद कुलकणी यांनी तर...पलभरके लिये कोई हमे याद करले....अस विजय मोडक यांनी म्हणत रसिकांना वेड केल.गुलाबी आंखे जो तेरी... शिवतेज ने सुरेख गायल.चंद्रकांत पंडित यांनी अर्पण या चित्रपटातील.... मोहब्बत अब तिजारत बन गयी...हे गाण म्हणत रसिकांना इमोशनल केल.मनिषाने...मी रात टाकली... विजयजींनी ...हे चिंचेचे झाड....तर अश्विनी ये ना... मिलिंद व पुष्पा मॅडम यांनी ही मराठी गाणी गात रसिकांची वाहवा मिळवली.ममता यांनी... आप जैसा कोई मेरी....पुजाने तेजाब मधिल...एक दोन तीन चार पाच..... चंद्रकांत पंडित यांनी... ओ मेरी जोहराजबी...या गाण्यांवर रसिकांना थिरकण्यास भाग पाडले. दिया विरमाणी हिच्या उभरत्या आवाजान सर्वांना इमोशनल केलं. कार्यक्रमाचे अतिशय खुमासदार व थोडक्या शब्दात निवेदन करत यश विरमाणी यांनी सासुबाई पुष्पा चौधरी समवेत...ये कहा आये हम...हे गीत गात अमिताभ बच्चन यांची आठवण करुन दिली.शेवटी एकडमीच्या प्रमुख पुष्पा मॅडम यांनी... चम चम करता है...म्हणत कार्यक्रम समाप्त केला.

सर्व कलाकारांना मान्यवरांच्या हस्ते सुंदर ट्रॉफी देवुन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमास पाहुणे म्हणुन श्री.विलास केरकर,श्री. विजय शिंदे,श्री.राहुल दांगट,श्री. मिठारीसर,श्री.जोशीसर,श्री. कांबळेसर,श्री.चव्हाण सर श्री. राजु पवार साहेब.श्री.विनोदसर. हे मान्यवर उपस्थित होते... श्री.चंद्रकांत पंडित यांनी सर्वाचे आभार माणुन कार्यक्रमाची सांगता केली...

## 'सूर लागू दे' चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला... १२ जानेवारीला संपूर्ण महाराष्ट्रात होणार प्रदर्शित

दिवंगत अभिनेते विक्रम गोखले यांचा 'सूर लागू दे' हा शेवटचा चित्रपट असल्याने कलाकारांपासून प्रेक्षकांपर्यंत सर्वांनाच या चित्रपटाबाबत कुतूहल आहे. या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच रिलीज करण्यात आला असून सोशल मीडियावर अल्पावधीत 'सूर लागू दे'च्या ट्रेलरला तूफान प्रतिसाद मिळू लागला आहे. १२ जानेवारी २०२४ रोजी हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

ऑडबॉल मोशन पिक्चर्सच्या बॅनरखाली निर्माते अभिषेक 'किंग' कुमार आणि नितीन उपाध्याय यांनी 'सूर लागू दे' या चित्रपटाची निमिती केली असून अश्विन पांचाळ या चित्रपटाचे प्रस्तुतकर्ते आहेत. प्रवीण विजया एकनाथ बिर्जे यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. पिकल एंटरटेन्मेंट स्टुडिओज हा चित्रपट महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात वितरीत करणार आहे. या चित्रपटाचं लेखन आशिष देव यांनी केलं आहे. 'सूर लागू दे'चा ट्रेलर पाहताक्षणीच लक्ष वेधून घेणारा आहे. चित्रपटात




काय पाहायला मिळेल याची झलक ट्रेलरमध्ये दिसते. विक्रम गोखले आणि ज्येष्ठ अभिनेत्री सुहासिनी मुळ्ये या चित्रपटाच्या निमित्ताने प्रथमच एकत्र आले आहेत. त्यांची केमिस्ट्री, अभिनयातील परीपक्वणा आणि देवाणघेवाण ट्रेलरमध्ये पाहायला मिळते. चित्रपटातील गाणीही सुरेख असून, अथर्पूर्ण संवाद उत्सुकता वाढवणारे आहेत. रीना मधुकर प्रमुख भूमिकेत असून त्यांनी टेलिव्हिजन आणि हिंदी, मराठी सिनेमातून उल्लेखनीय भूमिका साकारल्या आहेत. मेघना नायडू यांची सुद्धा महत्त्वपूर्ण भूमिका आहे. यापूवी मराठीसाठी गाणं करणाऱ्या मेघनाने या चित्रपटाच्या निमित्ताने प्रथमच भूमिका साकारली असून या चित्रपटात मेघना पत्रकाराच्या भूमिकेत दिसणार आहे. एक अनमोल संदेश देणारा हा चित्रपट प्रेक्षकांसाठी मनोरंजनाचं एक परिपूर्ण पॅकेज ठरणारा असल्याचं ट्रेलर पाहिल्यावर जाणवतं. याबाबत दिग्दर्शक प्रवीण बिर्जे म्हणाले की, या चित्रपटाचं कथानक कालातीत आहे. हे जगाच्या पाठीवर कुठेही घडू शकणारं असल्याने कोणत्याही प्रेक्षकाला हे आपलंसं करणारं आहे. यातील कलाकारांच्या अभिनयाची जुगलबंदी प्रेक्षकांना अखेरपर्यंत खिळवून ठेवणारी असून, यातील श्रवणीय गीत-संगीत मन मोहून टाकणारं आहे. संगीतकार पंकज पडघन यांचं संगीत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करेल.

'सूर लागू दे' हा चित्रपट समाजात घडणाऱ्या घटनांचं प्रतिबिंब दाखवणारा आहे. मानवाने ठरवलं तर कर्माच्या बळावर तो नराचा नारायण होऊ शकतो. एखादी चांगली गोष्ट करताना वय केवळ आकडा बनून राहातं. आयुष्याच्या संध्याकाळीही इतरांसाठी प्रेरणादायी कार्य करण्याचा संदेश 'सूर लागू दे'द्वारे सवर्दूर पोहोचणार आहे. विक्रम गोखले, सुहासिनी मुळ्ये, रीना मधुकर, मेघना नायडू यांच्यासह आशिष नेवाळकर, जयराज नायर, सुनील गोडबोले, सिद्धेश्वर झाडबुक्के, नितीन जाधव, आशा ज्ञाते, मेरू वेरणेकर, अनुराधा मोरे, शेखर शुक्ला, संदीप गायकवाड, हितेंद्र उपासनी, प्रदीप पटवर्धन, अस्लम वाडकर, सोमनाथ तळवलकर, सुनील जाधव, दीपिका गोलीपकर, अलका परब, अतुल गानोरकर, दिलीप कराडे, संदीप जयगडे, अमोघ चव्हाण, औदुंबर बाबर आदी कलाकारांच्याही चित्रपटात भूमिका आहेत.

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# पिंपरीत मद्यपान करणाऱ्या ३२२ जणांवर कारवाई

## २१ लाखांचा दंड वसूल



**पिंपरी :** पोलीस आयुक्तालयांतर्गत हॉटेल, ढाब्यांसह विविध ४७३ आस्थापनांची पाहणी करत नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. नव वर्षाचे स्वागत केल्यानंतर मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या ३२२ जणांवर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी कारवाई करत २१ लाखांचा दंड वसूल केला. नववर्षाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी ४० ठिकाणी नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली. नववर्षाचे स्वागत करताना रस्त्यावर गोंधळ घालणे, रात्री उशिरापर्यंत नियमांचे उल्लंघन करून ध्वनिप्रदूषण करणाऱ्यांवर कारवाई केली. मुख्य चौक, अंतर्गत रस्ते तसेच महामार्गांवर ठिकठिकाणी वाहन चालकांची तपासणी करण्यात आली. यातील मद्यपान करणाऱ्या चालकांवर कारवाई केली.

पोलीस आयुक्तालयांतर्गत हॉटेल, ढाब्यांसह विविध ४७३ आस्थापनांची पाहणी करत नियमांचे उल्लंघन करणा-यांवर कारवाई करण्यात आली. सराईत, विविध गुन्हे दाखल असलेल्या संशयितांची तपासणी करण्यात आली. संशयित दोन हजार ४२५ वाहनांची तपासणी करत बेशिस्त वाहनचालकांकडून २० लाख ६० हजार ८०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. एका जुगार अड्डा, अवैध दारु कारवाईत दोन लाख नऊ हजार ८७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

## तरुणीचा मद्यधुंद अवस्थेत गोंधळ

पुणे : वानवडी भागात मद्यधुंद तरुणीने सोसायटीच्या आवारात गोंधळ घातल्याची घटना उघडकीस आली आहे. मद्यधुंद तरुणी एका पोलीस अधिकाऱ्याची माहिती मिळाली असून, अद्याप याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला नाही.

नववर्षाच्या मध्यरात्री वानवडीतील एका सोसायटीत मद्यधुंद तरुणी आली. तिने सोसायटीच्या प्रवेशद्वारासमोर गोंधळ घालण्यास सुरुवात केली. सुरक्षारक्षकाच्या केबीनजवळ ठेवलेले टेबल तिने फेकून दिले. तरुणीचा आरडाओरडा ऐकून नागरिक जमा झाले. मद्यधुंद अवस्थेतील तरुणी ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हती. या घटनेचे चित्रीकरण सोसायटीतील कॅमेऱ्यांनी केले आहे. गोंधळ घालणारी तरुणी एका पोलीस अधिकाऱ्याची मुलगी असल्याची माहिती मिळाली आहे.

# क्लीन अप मार्शलच्या नेमणुका रखडल्या; प्रशासकीय प्रक्रियेमुळे विलंब

**मुंबई :** मुंबईत पुन्हा एकदा क्लीन अप मार्शल नियुक्त करण्यात येणार असून संपूर्ण मुंबईत ७२० क्लीन अप मार्शल तैनात करण्यात येणार आहेत. मात्र प्रशासकीय दिरंगाईमुळे क्लीन अप मार्शलच्या नियुक्तीची प्रक्रिया रखडली आहे. आता जानेवारी महिन्यात त्यांची नेमणूक होण्याची शक्यता आहे. त्यानंतर मुंबईत पुन्हा एकदा क्लीन अप मार्शलमार्फत दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार प्रदूषणमुक्त आणि स्वच्छ, सुंदर मुंबईसाठी मुंबई महापालिकेने संपूर्ण स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. मुंबईत अस्वच्छता करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी पालिकेने पुन्हा एकदा क्लीन अप मार्शल नेमण्याचे ठरवले आहे. काही महिन्यांपूवी मुंबईत स्वच्छता दूत नेमण्याची घोषणा पालिका प्रशासनाने केली होती. दंडात्मक कारवाई न करता केवळ प्रबोधनाच्या हेतूने स्वच्छता दूत नेमण्यात येणार होते. मात्र हा उपक्रम बारगळल्यानंतर आता पुन्हा एकदा




क्लीन अप मार्शल नेमण्याचे पालिका प्रशासनाने ठरवले आहे. प्रत्येक विभागात ३० ते ३५ क्लीन अप मार्शल याप्रमाणे संपूर्ण मुंबईसाठी ७२० मार्शल नेमण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार होती. डिसेंबर महिन्यात क्लीन अप मार्शल नेमण्यात येणार होते. मात्र प्रशासकीय दिरंगाईमुळे त्यांच्या नेमणुकीला विलंब झाला असून आता जानेवारीत क्लीन अप मार्शलची नियुक्त करण्यात येणार आहे.

पालिकेने सर्वप्रथम २००७ मध्ये क्लीन अप मार्शलची नेमणूक केली होती. मार्शलबाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारी येत असल्यामुळे पालिकेने २०११ मध्ये त्यांची सेवा बंद केली. मग २०१६ मध्ये पुन्हा एकदा क्लीन अप मार्शलची नेमणूक करण्यात आली होती. त्यावेळीही मोठ्या प्रमाणावर तक्रारी येऊ लागल्या होत्या. मार्शल हे विनाकारण नागरिकांना त्रास देत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या. तसेच पैसे उकळण्याच्या, दादागिरी करण्याच्या तक्रारीही केल्या जात होत्या. मग २०१८ मध्ये हे कंत्राट संपल्यानंतर पुन्हा नेमणूक करण्यात आली नाही. करोनाकाळात मुखपट्ट्या न लावणाऱ्यांविरोधातील कारवाईसाठी पुन्हा एकदा क्लीन अप मार्शलच्या नेमणूका केल्या होत्या.

चौकट रस्त्यावर थुंकणे, कचरा टाकणे, रस्त्यावर स्नान करणे, मलमूत्र विसर्जन करणे अशा प्रत्येक चुकांसाठी २०० रुपये ते एक हजार रुपये दंड वसूल केला जाणार आहे. वसूल केलेल्या दंडापैकी ५० टक्के रक्कम क्लीन अप मार्शलचा पुरवठा करणाऱ्या संस्थेला तर ५० टक्के रक्कम पालिकेला मिळणार आहे.

# कर्करोगग्रस्त मुलांना मिळणार दिलासा; नववर्षापासून होणार प्रोटॉन पद्धतीने उपचार

**मुंबई :** कर्करोग रुग्णांसाठी लाभदायक ठरणाऱ्या रेडिएशन उपचार पद्धतीचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात येतो. मात्र आता कर्करोग रुग्णांसाठी प्रोटॉन थेरपी महत्त्वपूर्ण ठरत आहे. आतापर्यंत केवळ वयस्कर व्यक्तींसाठी वापरण्यात येणाऱ्या या थेरपीचा आता लहान मुलांसाठीही वापर करण्याचा निर्णय टाटा रुग्णालयाने घेतला आहे. जानेवारीपासून लहान मुलांवर प्रोटॉन थेरपीच्या माध्यमातून उपचार करण्यात येणार आहेत. सुरुवातीला डोके आणि मानेच्या कर्करोगाने ग्रस्त मुलांवर या पद्धतीने उपचार करण्यात येणार आहेत. त्यानंतर भविष्यात टप्प्याटप्प्याने अन्य कर्करोगाने ग्रस्त लहान मुलांवर या पद्धतीने उपचार करण्यात येणार आहेत. दरम्यान, प्रोटॉन उपचार



पद्धतीचा दरवषी २५०० ते ३००० मुलांना लाभ होणार आहे.

खारघर येथील टाटा रुग्णालयाच्या ॲक्ट्रक केंद्रामध्ये १५ ऑगस्ट रोजी प्रोटॉन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. या केंद्रामध्ये हाडांच्या कर्करोग रुग्णांवर प्रोटॉन उपचार पद्धतीच्या माध्यमातून उपचार केले जातात. प्रोटॉन उपचार पद्धतीने आतापर्यंत २६ वयस्क रुग्णांवर उपचार करण्यात आले असून, त्यांना या सुविधेचा चांगला लाभ झाला आहे. सामान्य रेडिएशनमध्ये दिसणारे दुष्परिणाम आजपर्यंत या पद्धतीमध्ये एकाही रुग्णांमध्ये दिसले नाहीत. प्रोटॉन थेरपीमध्ये चांगल्या पेशी नष्ट झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे कर्करोगग्रस्त लहान मुलांसाठी या पद्धतीचा वापर करण्याची आम्ही तयारी सुरू केली आहे. हे तंत्र समजून घेण्यासाठी आणि परिणाम जाणून घेण्यासाठी आम्ही प्रथम प्रौढांवर प्रोटॉन थेरपी सुरू केली होती. लहान मुलांवर प्रोटॉन पद्धतीने उपचार करण्याच्या प्रक्रियेला जानेवारीमध्ये सुरूवात करण्यात येणार आहे. सुरुवातील ज्या लहान मुलांना डोके व मान, ब्रेन ट्यूमुर आणि पोटाचा कर्करोग असलेल्या मुलांवर या पद्धतीने उपचार करण्यात येणार असल्याची माहिती टाटा रुग्णालयाचे उपसंचालक, प्रोटॉन सेंटरचे प्रमुख डॉ. सिद्धार्थ लष्कर यांनी दिली.

खारघर येथील ॲक्ट्रकमध्ये सध्या एका कक्षामध्ये प्रोटॉन पद्धतीने उपचार करण्यात येत आहे. मात्र टप्याटप्प्याने तीन कक्ष उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे अधिकाधिक रुग्णांना या पद्धतीने उपचार घेता येतील. साधारण एका रुग्णाला किमान ७ ते ८ आठवडे उपचारासाठी बोलविण्यात येते. तर काही रुग्णांसाठी हा कालावधी पाच ते सहा आठवडे असण्याची शक्यता आहे.

यासाठी प्रोटॉन प्रभावी आहे स्तन, अन्ननलिका, जठरासंबंधी, डोके आणि मान, यकृत, फुफ्फुस, स्वादुपिंड, मूत्राशय आणि मणक्याच्या कर्करोगामध्ये प्रोटॉन पद्धत प्रभावी ठरत आहे. परंतु सर्वच रुग्णांवर या पद्धतीने उपचार केले जात नाहीत. या पद्धतीने कोणत्या रुग्णांवर उपचार करायचे याबाबतचा निर्णय रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक घेते.

# रब्बी हंगामातील पेरण्या अकरा टक्क्यांनी घटल्या

**पुणे :** यंदाच्या रब्बी हंगामातील पेरण्यांमध्ये अकरा टक्क्यांनी घट झाली आहे. राज्यातील रब्बीचे क्षेत्र सरासरी ५४ लाख हेक्टरच्या घरात आहे. मागील वषी ५४.६४ लाख हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. यंदा एक डिसेंबरअखेर ४८.६५ लाख हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. मागील वषीच्या तुलनेत यंदा अकरा टक्क्यांनी घट होऊन रब्बी पेरण्या ८९ टक्क्यांवर स्थिरावल्या आहेत.

कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात यंदा अपुरा पाऊस झाला आहे. विहिरी, कूपनलिकांना पुरेसे पाणी नाही. धरणांमध्ये पुरेसे पाणी नसल्यामुळे रब्बी हंगामातील पिकांना पुरेसे आवर्तन मिळण्याची शक्यता नाही, त्यामुळे राज्यात रब्बी हंगामातील पेरण्या मागील वर्षाच्या तुलनेत ८९ टक्क्यांवर स्थिरावल्या आहेत.

राज्यात रब्बी हंगामाचे सरासरी क्षेत्र ५३ लाख ९६ हजार ९६९ हेक्टर आहे. मागील वषी पाण्याची उपलब्धता चांगली असल्यामुळे ५४ लाख ६४ हजार ७१६ हेक्टरवर पेरण्या झाल्या होत्या. यंदा एक डिसेंबरअखेर ४८ लाख ६५ हजार ३२० हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. यंदाच्या पेरण्या मागील पाच वर्षांच्या सरासरीच्या तुलनेत ९०.१५ टक्के आणि मागील वर्षाच्या तुलनेत ८९ टक्के झाल्या आहेत. राज्यात रब्बी हंगामात ऊसतोडणीनंतर जानेवारीअखेरपर्यंत पेरण्या होतात. पण, यंदा पाण्याची उपलब्धता कमी असल्यामुळे आता पेरण्यांचा टक्का फारसा वाढण्याची



शक्यता नाही.

अपुऱ्या पावसामुळे राज्यभरात रब्बी हंगामासाठी पाण्याची उपलब्धता कमी आहे. परिणामी पेरण्यांमध्ये घट झाली आहे. कमी पाण्यावर येणाऱ्या ज्वारी आणि करडई पिकाला शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले आहे, अशी माहिती विकास आणि प्रशिक्षण विभागाचे संचालक दिलीप झेंडे यांनी दिली.

### ज्वारी, करडईचा पेरा वाढला

मागील हंगामाच्या तुलनेत यंदा रब्बी हंगामात ज्वारीची पेरणी १०९ टक्क्यांवर गेली असून, राज्यभरात १३ लाख ६४ हजार ३८७ हेक्टरवर पेरणी झाली आहे. करडईची पेरणी १२७ टक्क्यांवर गेली असून, ३८ हजार ३४५ हेक्टरवर पेरा झाला आहे. गव्हाची ७८ टक्के, मक्याची ८१ टक्के, इतर तृणधान्यांची ७९ टक्के, कडधान्यांची ७० टक्के तर करडईचा पेरा वाढल्यामुळे तेलबियांच्या पेरण्या ९८ टक्क्यांवर गेल्या आहेत.

# भिवंडीत कत्तल केलेल्या म्हैस आणि रेड्याच्या चरबीपासून बनावट तूप



**ठाणे :** भिवंडीत कत्तल केलेल्या म्हैशी आणि रेड्यांचे अवशेष आणून त्यामधील चरबी वितळवून बनावट तूप बनविण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हे तूप मोठ्या खानावळी, उपाहारगृहांना विक्री केला जात होता. महापालिकेने बनावट तुपाचे १५ किलो वजनाचे २० डबे आणि कढई असे साहित्य जप्त केले आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल केला जाणार असल्याची माहिती भिवंडी महापालिका प्रशासनाने दिली. भिवंडी येथील भोईवाडा भागात इदगाह साल्टर हाऊस हा बंद कत्तलखाना आहे.

या कत्तलखान्यात कापण्यात आलेले म्हैस आणि रेड्यांचे उरलेले अवशेष टाकले जाते. हे अवशेष गोळा करून त्यामधील चरबी काढून ती सुकविली जात होती. तसेच त्यापासून तूप बनविले जात असल्याच्या तक्रारी भिवंडी महापालिका प्रशासनाला प्राप्त झाल्या होत्या. या माहितीच्या आधारे, महापालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या आदेशाने पर्यावरण विभागाचे नियंत्रण अधिकारी सुदाम जाधव यांचे पथक आणि आपत्कालीन विभागाच्या पथकाने घटनास्थळी धाड मारली. कारवाई दरम्यान तेथे तूप कढविण्याची भट्टी सुरू असल्याचे आढळून आले. पालिका कर्मचाऱ्यांनी कढई मधील साहित्य ओतले. तसेच बनावट तुपाचे १५ किलो वजनाचे २० डबे आणि कढई असे साहित्य जप्त केले आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल केला जाणार असल्याची माहिती भिवंडी महापालिका प्रशासनाने दिली.

# महानंद एनडीडीबीच्या घशात

## संचालक मंडळ बरखास्त करून कारभार एनडीडीबीकडे देण्याचा ठराव

**पुणे :** पुरेसे दूध संकलन आणि वितरणा अभावी आर्थिक अडचणींच्या खोल गर्तेत सापडलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई म्हणजेच महानंदच्या संचालक मंडळाने महानंद राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डाला (एनडीडीबीला) चालविण्यासाठी द्यावे, असा ठराव करून सरकारला पाठविला आहे. त्यामुळे केवळ कार्यक्षम कारभाराच्या अभावामुळे एकेकाळी राज्याचे वैभव असलेली महानंद डेअरी एनडीडीबीच्या घशात जाणार, हे स्पष्ट झाले आहे.

अनागोंदी कारभार, जिल्हा दूध संघांकडून केला जाणारा असहाकर, भ्रष्टाचार आणि राज्य सरकारच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे महानंदच्या दूध संकलनात मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे. पिशवी बंद दूध वितरण ७० हजार लिटरवर आले आहे. प्रक्रिया प्रकल्पांना दूधच मिळत नसल्यामुळे प्रकल्प गंजून चालले आहेत. कर्मचाऱ्यांचे पगारही वेळेत होत नाहीत. त्यामुळे महानंद एनडीडीबीला चालविण्यासाठी देण्याची मागणी पुढे आली होती. राज्य सरकारनेही त्यासाठी पुढाकार घेतला होता. कर्मचाऱ्यांचा वाढता रोष आणि वाढत्या तोट्यावर मार्ग म्हणून महानंदच्या संचालक मंडळाने २८ डिसेंबर रोजी महानंद एनडीडीबीला चालविण्यासाठी देण्याचा ठराव




मंजूर करून संबंधित ठराव तत्काळ राज्य सरकारला पाठविण्यात यावा, असा निर्णय घेतला होता. त्यानुसार महानंदकडून ठराव राज्य सरकारला सादर करण्यात आला आहे. त्यावर लवकरच निर्णय होण्याची शक्यता आहे.

अध्यक्षांचा दोन महिन्यांपूवीच राजीनामा

कर्मचाऱ्यांचा वाढता रोष आणि सरकारकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्यामुळे कोंडीत सापडलेले महानंदचे अध्यक्ष राजेश परजणे-पाटील यांनी दोन महिन्यांपूवीच अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. पण, संचालक मंडळाने त्यांचा राजीनामा स्विकारला नव्हता. त्यामुळे परजणे-पाटील अध्यक्ष म्हणून काम करीत असले तरीही त्यांनी महानंदमधून लक्ष काढले होते, अशी माहिती कामगार संघटनेकडून देण्यात आली. दोन महिन्यांपूवी राजीनामा दिल्याच्या घटनेला महानंदचे अध्यक्ष राजेश परजणे-पाटील यांनी दुजोरा दिला आहे.

महानंदचे एनडीडीबीपुढे लोटांगण ?

महानंदचे संचालक मंडळ बरखास्त करून पूर्ण कारभार एनडीडीबीकडे द्यायचा की, संचालक मंडळ कायम ठेवून कारभार एनडीडीबीकडे द्यायचा, असे दोन प्रवाह संचालक मंडळात होते. पण, एनडीडीबीने संचालक मंडळ बरखास्त करून पूर्णपणे कारभार आमच्याकडे द्या, अतिरिक्त कामगार कमी करा, अशा दोन प्रमुख अटी ठेवल्यामुळे संचालक मंडळ बरखास्त करून पूर्ण कारभार एनडीडीबीकडे देण्याचा ठराव करण्यात आला. सध्या महानंदकडे सुमारे ९३७ कामगार आहेत, त्यापैकी ५६० कामगारांनी फेब्रुवारी २०२२मध्येच स्वेच्छा निवृत्तीसाठी अर्ज केले आहेत. पण, अद्याप त्या बाबत निर्णय झालेला नाही. त्यामुळे कामगारांच्या स्वेच्छा निवृत्ती बाबतचा निर्णय राज्य सरकारने घेतल्यानंतरच महानंद एनडीडीबीकडे दिले जाण्याची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

# ठाण्यातील नाट्यगृहांच्या भाडेदरात कपात

**ठाणे:** मराठी नाटके आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना उभारी मिळावी या उद्देशातून ठाणे महापालिकेने मराठी भाषेतील कार्यक्रमांसाठी राम गणेश गडकरी रंगायतन आणि डॉ, काशीनाथ घाणेकर या दोन्ही नाट्यगृहातील भाडे दरात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे भाडे दरात निम्म्यापेक्षा जास्त कमी झाल्याने नाट्य तसेच विविध संस्थांना नव्या वर्षात भाडे कपातीचा दिलासा मिळाला आहे. मुंबई आणि नवी मुंबईतील नाट्यगृहांच्या तुलनेत भाडेदर जास्त असल्यामुळे ठाणे महापालिकेने ही भाडेदर कपातीचा निर्णय घेतला असून या निणर्याची अंमलबजावणी १ जानेवारीपासून सुरू करण्यात आली आहे. ही सवलत घेऊन इतर कार्यक्रम केले तर १० हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे.

ठाणे शहराच्या मध्यवती भागात राम गणेश गडकरी रंगायतन नाट्यगृह आहे. तर, नवे ठाणे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या घोडबंदर भागात डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह आहे. शहराचा मानबिंदू असलेली ही दोन्ही नाट्यगृहे सांस्कृतिक चळवळीचे केंद्रबिंदू म्हणून परिचित आहेत. गडकरी रंगायतन नाट्यगृहाची आसन क्षमता १०५६ इतकी आहे. घाणेकर नाट्यगृहाची १०९५ तर, येथील लघु सभागृहाची क्षमता १८२ इतकी आहे. या



नाट्यगृहांमध्ये शनिवारी आणि रविवार या सुट्टीच्या दिवशी पाच हजारांच्या आसपास प्रेक्षक येतात. या दोन्ही नाट्यगृहातील भाडे दर मुंबई आणि नवी मुंबई महापालिका नाट्यगृहाच्या तुलनेत दुप्पट आहे. रविवारच्या दिवशी हे भाडे अधिक असते.

रविवारच्या दिवशी वाशी येथील विष्णूदास भावे नाट्यगृहाचे भाडे वस्तु व सेवा करासहित ९ हजार ५०० रुपये इतके असते. याच दिवशी ठाण्यातील डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृहाचे भाडे वस्तु व सेवा करासहित ३७ हजार ५०० रुपये तर, गडकरी रंगायतनचे भाडे वस्तु व सेवा करासहित २६ हजार ४०० इतके असते. हे भाडे दर कमी करण्याची मागणी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद आणि जागतिक मराठी नाट्यधमी निर्माता संघ या संस्थांनी काही महिन्यांपुवी केली होती. ही मागणी मान्य करत ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी भाडे दरात निम्म्यापेक्षा जास्त कपात केली आहे. सर्व संस्था, सामाजिक संस्था, राजकीय पंक्षाचे कार्यक्रम, शाळा महाविद्यालयीन कार्यक्रम विना तिकीट असतील तर त्यांना १२ हजार ५०० भाडे भरावे लागणार असून हे दर पुवी इतकेच आहेत.

स्वनिर्मित नाट्यप्रयोग, एकांकिका या कार्यक्रमांसाठी ३००रुपये तिकीट दर असेल तर त्यासाठी यापुवी सोमवार ते शुक्रवार २६ हजार ८२० रुपये, शनिवारी ३० हजार ६४० रुपये आणि रविवारी ३४ हजार ४८० रुपये इतके भाडे आकारले जात होते. नवीन दरानुसार सोमवार ते शुक्रवार १२ हजार १७० रुपये, शनिवारी १३ हजार ९०० रुपये आणि रविवारी १५ हजार ६४० रुपये इतके भाडे आकारले जाणार आहे. स्वनिर्मित नाट्यप्रयोग, एकांकिका या कार्यक्रमांसाठी ३०१ ते ५०० रुपये तिकीट दर असेल तर त्यासाठी यापुवी सोमवार ते शुक्रवार २९ हजार ३७० रुपये, शनिवारी ३३ हजार २१० रुपये आणि रविवारी ४२ हजार १४० रुपये इतके भाडे आकारले जात होते.

आता सोमवार ते शुक्रवार १३ हजार ३३० रुपये, शनिवारी १५ हजार ०६० रुपये आणि रविवारी १९ हजार ११० रुपये इतके भाडे आकारले जाणार आहे. स्वनिर्मित नाट्यप्रयोग, एकांकिका या कार्यक्रमांसाठी पाचशे रुपयांपेक्षा अधिक तिकीट दर असेल तर त्यासाठी यापुवी सोमवार ते शुक्रवार २९ हजार ३७० रुपये, शनिवारी ३३ हजार २१० रुपये आणि रविवारी ४२ हजार १४० रुपये इतके भाडे आकारले जात होते. नवीन दरानुसार सोमवार ते शुक्रवार १४ हजार ७०० रुपये, शनिवारी १६ हजार ६२० रुपये आणि रविवारी २१ हजार ०८० रुपये इतके भाडे आकारले जाणार आहे.

ठाण्यातील दोन्ही नाट्यगृहातील भाडे दर मुंबई आणि नवी मुंबई महापालिका नाट्यगृहाच्या जास्त होते. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद आणि जागतिक मराठी नाट्यधमी निर्माता संघ या संस्थांनी केलेल्या मागणीचा विचार करून हे दर कमी करण्यात आले आहेत. मराठी नाटके आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना उभारी मिळावी या उद्देशातून हा निर्णय घेण्यात आला आहे. मराठी नाटके आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठीच ही सवलत लागू असेल. ही सवलत घेऊन इतर कार्यक्रम केले तर १० हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे. झ्र उमेश बिरारी, उपायुक्त, ठाणे महापालिका

## कल्याणमध्ये नोकरीचे आमिष दाखवून तरूणाची अकरा लाखाची फसवणूक

**कल्याण:** सरकारी नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यासाठी ११ लाख रूपये भरण्यास सांगून एका तरूणाची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी विठ्ठलवाडी येथील तीन जणांच्या विरूध्द कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रकाश मुन्नालाल नेवारे (२८) असे फसवणूक झालेल्या तरूणाचे नाव आहे. तो विठ्ठलवाडी येथील विनायक कॉलनी भागात राहतो. घनश्याम मोहन परब, स्नेहल घनश्याम परब आणि विशाल ढोकळे अशी आरोपींची नावे आहेत. मागील दोन वर्षाच्या कालावधीत ही फसवणूक करण्यात आली आहे. सरकारी नोकरी मिळवून देतो. आमची वरिष्ठ पातळीवर ओळख आहे, असे सांगून आरोपींची प्रकाशचा विश्वास संपादन केला. सरकारी नोकरी मिळते म्हणून प्रकाश याने आरोपींच्या मागणीप्रमाणे त्यांना रोख, धनादेश आणि ऑनलाईन माध्यमातून दोन वर्षाच्या काळात टप्प्याने अकरा लाख रूपये दिले.

पैसे भरणा केल्यानंतर प्रकाश आरोपींकडे नोकरीचे नियुक्ती पत्र मागु लागला. त्यावेळी ते लवकरच मिळेल. संबंधित अधिकारी रजेवर आहेत. ते आले की तुझे काम होईल, अशी कारणे देऊन वेळकाढूपणा करू लागले. वर्ष होऊन गेले तरी आपणास नियुक्तीचे पत्र मिळत नाही. प्रकाशला आरोपी टाळू लागले. संपर्काला प्रतिसाद देणे त्यांनी थांबविले. प्रकाश त्यांचा शोध घेऊ लागला तर ते प्रत्यक्ष कोठे भेटत नव्हते. आपली आरोपींनी फसवणूक केल्याची खात्री झाल्यावर प्रकाश नेवारे याने पोलीस ठाण्यात तक्रार केली.

# अन्नसेवन हे एक ‘यज्ञकर्म’!



**हिंदु** धर्मशास्त्रात नामजपासहित सात्त्विक अन्नसेवनाला ‘यज्ञकर्म’ म्हटले आहे. ‘यज्ञकर्म’ केल्याने अन्नाचे सहज पचन होते आणि प्राणशक्ती मिळते. तेलकट आणि तिखट असे तामसिक अन्न खाण्यापेक्षा सात्त्विक अन्न खाण्याने मनुष्याचे आध्यात्मिक बळ वाढून त्याला ईश्वरी अनुसंधानात राहणे शक्य होते.

**अन्न ‘ब्रह्मस्वरूप’ असणे**

**हें न म्हणावें साधारण । अन्न ब्रह्मरूप जाण ।**
**हें जीवनहेतुकारण । विश्वा यया ।।**

\- श्री ज्ञानेश्वरी ३.१३३

संत ज्ञानेश्वर सांगतात, ‘अन्न हेच ब्रह्मस्वरूप आहे.’ जसे सर्व विश्व ब्रह्मातून उत्पन्न होते, ब्रह्मावरच जगते आणि ब्रह्मातच विलीन होते, तसेच सर्व प्राणीमात्र अन्नापासूनच उत्पन्न होतात, अन्नावरच जगतात अन् अन्नातच विलीन होतात.

सात्त्विक अन्नसेवनातून निर्माण होणाऱ्या देहातील प्रदीप्त अग्नीतून पंचप्राण जागृत होऊन ते जिवाला ब्रह्मप्राप्तीचा आनंद मिळवून देऊ शकत असल्याने अन्नाला ‘ब्रह्मस्वरूप’ म्हटले जाणे.

**शास्त्र :** ‘सात्त्विक अन्नसेवन आणि पचनातील क्रियेने जठराग्नी प्रज्वलित आणि प्रदीप्त होतो. या तेजरूपी अग्नीच्या स्पर्शाने नाभीस्थित पंचप्राण जागृत होतात. या पंचप्राणांच्या जागृतीने देहातील अंतर्गत पोकळ्या निर्गुण स्तरावर कार्यरत होतात. हे पंचप्राण हळूहळू ऊर्ध्वगामी पद्धतीने कार्यरत होऊन अन्नातील सात्त्विकतेचे देहात प्रसारण करून जिवाच्या सुषुम्ना नाडीला जागृती देतात. ही जागृती ब्रह्मस्वरूप, म्हणजेच अद्वैताचा आनंद देणारी असते. सात्त्विक अन्नसेवनातून निर्माण होणाऱ्या देहातील प्रदीप्त अग्नीतून पंचप्राण जागृत होऊन ते ऊर्ध्वगामी पद्धतीने जिवाला सुषुम्ना जागृतीच्या टप्प्यातून अद्वैताकडे नेऊ शकतात, म्हणजेच ब्रह्मप्राप्तीचा आनंद मिळवून देऊ शकतात; म्हणून अन्नाला ‘ब्रह्मस्वरूप’ म्हटले जाते.

**अन्नदेवता**

**अन्नदेव :**

अन्नदेव ही कृषीदेवता आहे.

श्री अन्नपूर्णा

श्री अन्नपूर्णा म्हणजे अन्नधान्य पुरविणारी देवता. ही पार्वतीचा अवतार आहे. काशी नगरीमध्ये श्री अन्नपूर्णेचे देऊळ असून ‘त्या क्षेत्रातील समस्त जनता जेवल्याविना ती अन्नग्रहण करत नाही’, असे समजले जाते. चांद्रसेनीय कायस्थ समाजात गृहिणी आपला पती प्रवासाहून घरी येण्याच्या वेळी हिची पूजा करतात. हिच्या मस्तकावर पिवळ्या अक्षता वाहतात आणि ‘घरी येणाऱ्या थोर पाहुण्याचे (पतीचे) रक्षण कर’, अशी प्रार्थना करतात.



**श्रीविष्णु :**

श्रीविष्णु हा सृष्टीचा पालनकर्ता असल्याने तोच अन्नरसदेवता आहे.

(श्रीविष्णुविषयी अधिक ज्ञान सनातनच्या ‘श्रीविष्णु, श्रीराम आणि श्रीकृष्ण’ या ग्रंथात दिले आहे.)

विष्णुसहस्रनामातील श्रीविष्णूच्या नावांपैकी १४२ वे नाव ‘भोजन’, तर १४३ वे नाव ‘भोक्ता’ असे आहे, म्हणून ‘भोजनाय नमः’ आणि ‘भोक्त्रे नमः’, म्हणजेच ‘अन्नाला नमस्कार’ आणि ‘अन्न खाणाऱ्याला नमस्कार’, असे म्हटले आहे.

---



# शुक्रवारी मनी प्लांटच्या मुळावर ही छोटीशी गोष्ट बांधा, व्हाल श्रीमंत

**वास्तूनुसार** मनी प्लांटला लाल रंगाचा धागा किंवा लाल कपडा बांधणे अत्यंत शुभ मानले जाते. म्हणूनच शुक्रवारी मनी प्लांटच्या मुळाशी लाल रंगाचा कलवा बांधावा. हा धागा किंवा कलवा बांधताना धनाची देवी माँ लक्ष्मीचे स्मरण करून, सुख-समृद्धी, धन-धान्य वाढीसाठी कलवा मुळास बांधावा.

**नियमितपणे दूध द्या :** वास्तुशास्त्रानुसार मनी प्लांटला रोज पाणी अर्पण करावे. पाणी देताना त्यात थोडेसे कच्चे दूध मिसळा. असे केल्याने मनी प्लांट वेगाने वाढेल. असे केल्याने व्यक्तीला जलद प्रगती आणि प्रगतीसोबतच धनाचा लाभही होतो.

**मनी प्लांट घराबाहेर ठेवू नका :** तज्ज्ञांच्या मते, वास्तुशास्त्रात असे सांगितले आहे की अशा ठिकाणी कधीही मनी प्लांट ठेवू नये. बाहेरून येणाऱ्या-जाणाऱ्यांची नजर मनी प्लांटच्या रोपावर पडते. त्यावर कोणाचीही वाईट नजर पडू शकते. म्हणूनच घरामध्ये पैशाच्या आगमनासाठी मनी प्लांट लपवून ठेवणे योग्य आणि चांगले आहे.

# जिओ टीव्ही प्रीमियमवर मोफत पाहता येतील १४ ओटीटीवरील चित्रपट आणि शो




जिओटीव्ही प्रीमियम सब्सक्रिप्शन सह तीन नवीन प्रीपेड प्लॅन लाँच केले आहेत. ह्या प्लॅनसह डेटा आणि अनलिमिटेड कॉलिंग मिळते. त्याचबरोबर १४ ओटीटी प्लॅटफॉर्मचं फ्री सब्सक्रिप्शन देखील मिळेल.

**रिलायंस** जिओने जिओ टीव्ही प्रीमियम सब्सक्रिप्शनसह तीन नवीन प्लॅन लाँच केले आहेत. जिओ टीव्ही प्रीमियममध्ये कंपनी १४ ओटीटी ॲप्स जसे की जियोसिनेमा प्रीमियम, डिज्नी+हॉटस्टार, जी५, सोनी लीव, प्राइम वीडियो (मोबाइल), लायंसगेट प्ले, डिस्कवरी+, डॉक्यूबे, होइचोई, सनएनएक्सटी, प्लॅनेट मराठी, चौपाल, एपिकॉन आणि कांचा लंका ऑफर करत आहे. ह्याचा अर्थ असा की जिओ प्रीमियमसह ग्राहकांना एकत्र अनेक ओटीटीचे सबस्क्रिप्शन मिळत आहे. पहिल्यांदाच जिओ टीव्ही प्रीमियम प्लॅन सादर करण्यात आले आहेत, ह्याआधी जिओ टीव्ही मोफत वापरता येत होतं. चला नवीन प्लॅन्सची माहित घेऊ.

जिओ टीव्ही प्रीमियम सह आलेले तीन प्रीपेड प्लॅन कंपनीनं तीन जिओ टीव्ही प्रीमियम प्लॅन लाँच केले आहेत. ह्यात ३९८ रुपये, ११९८ रुपये आणि ४४९८ रुपयांचा प्लॅनचा समावेश आहेत.

**३९८ रुपयांचा प्लॅन :** ह्या प्लॅनची वैधता २८ दिवस आहे. ह्यात युजर्सना २जीबी डेली डेटासह अनलिमिटेड कॉलिंगची सुविधा मिळत आहे. इतकेच नव्हे तर प्लॅनमध्ये १०० फ्री एसएमएस देखील दिले जात आहेत. तसेच ह्या प्लॅनमध्ये युजर्सना १२ ओटीटी प्लॅटफॉर्मचं सब्सक्रिप्शन मिळेल.

**११९८ रुपयांचा प्लॅन :** कंपनीच्या ह्या प्लॅनमध्ये २जीबी डेली डेटा मिळतो. सोबत १४ ओटीटी प्लॅटफॉर्मचं फ्री सब्सक्रिप्शन मिळत आहे. ह्या प्लॅनची वैधता ८४ दिवस आहे.

**४४९८ रुपयांचा प्लॅन :** ह्या प्लॅनमध्ये कंपनी २जीबी डेली मिळत आहे. त्याचबरोबर ह्या पॅकसह युजर्स १४ ओटीटी चं फ्री सबस्क्रिप्शन देखील मिळवता येईल. ह्या प्लॅनमध्ये देखील अनलिमिटेड कॉलिंगसह रोज १०० फ्री एसएमएस मिळत आहेत. ह्याची वैधता ३६५ दिवस म्हणजे एक वर्ष आहे.

**नवीन ॲड-ऑन प्लॅनही आला**

त्याचबरोबर कंपनीनं ॲड-ऑन प्लॅन देखील लाँच केला आहे. ह्याची किंमत १४८ रुपये आहे. ह्यात युजर्सना १२ ओटीटीचं सबस्क्रिप्शन मिळत आहे. ह्यात देखील अनलिमिटेड कॉलिंग आणि रोज १०० फ्री एसएमएस मिळतील. ह्याची व्हॅलिडिटी २८ दिवस आहे.

विशेष म्हणजे ह्या सर्व नवीन प्लॅन्सचा लाभ घेण्यासाठी युजर्सना ॲपवर आपल्या रजिस्टर्ड मोबाइल नंबरनं साइन करावं लागेल. त्यानंतर होम स्क्रीनवर जिओ टीव्ही प्रीमियमटॅब मिळेल. इथून युजर्स हे नवीन प्लॅन सहज क्लेम करू शकतात.

---



# हिवाळ्यात फिरायला जाताय? तर ही काळजी नक्की घ्या

**हिवाळा** म्हणजेच नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये नाताळच्या सुट्ट्या जवळ आल्या की कुटुंबासोबत किंवा मित्रमंडळींबरोबर फिरायला जाण्याचे प्लॅन रंगतात. कधी ४ दिवसांची लहान ट्रीप तर कधी १० ते १२ दिवसांची मोठी ट्रीप करण्याचा बेत ठरतो. रोजच्या रुटीनमधून थोडा ब्रेक म्हणून अशी सहल नक्कीच आपल्याला रिफ्रेश करणारी ठरते. पण, हिवाळ्यात प्रवास करताना आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे असते. आता नेमकी कोणती आणि कशी काळजी घेतल्यास आपला प्रवास आणि एकूणच ट्रीप चांगली होऊ शकते पाहूयात...

हिवाळ्यात थंडीमुळे प्रवासादरम्यान पाय आणि शरीराचे सांधे आखडण्याची शक्यता असते. त्याचा नंतर त्रास होऊ शकतो. त्यामुळे ठराविक वेळाने गाडी असेल तर ती थांबवून खाली उतरा. रेल्वेमध्ये असाल तर एखादी चक्कर मारुन या. त्यामुळे पायाचे स्नायू मोकळे राहण्यास मदत होईल.

प्रवासात गार पाणी किंवा शीतपेये प्यायल्याने घसा खराब होण्याची शक्यता असते. तसेच बाहेर गेलो असल्याने तेलकट पदार्थही खाण्यात येतात. अशावेळी घसा दुखू नये यासाठी शक्यतो कोमट पाणी पीत राहा. ते शक्य नसल्यास चहा किंवा कॉफी घेतल्यानेही घशाला आराम मिळतो.

थंडीमुळे सर्दी-खोकला होण्याची शक्यता असल्याने त्यासाठी आवश्यक असणारी घरगुती औषधे, सर्दीसाठी उपयुक्त एखादा बाम, घशाला आराम देणाऱ्या गोळ्या घेऊन ठेवा. नवीन ठिकाणी कोणी आजारी पडले आणि लगेच डॉक्टर गाठणे शक्य नसेल तर या औषधांचा उपयोग होतो.

बर्फाळ प्रदेशात स्नो फॉल पाहण्यासाठी जाणार असाल तर थोडी जास्त काळजी घ्या. बर्फावर जास्त काळ चालू नका. त्यामुळे स्नायू बधीर होऊन त्रास होण्याची शक्यता असते. याशिवाय प्रवास करताना कानावर गार वारे बसणार नाही याची काळजी घ्या. त्यानेही लगेचच सर्दी-खोकला होण्याची शक्यता असते.

तुम्ही जात असलेल्या ठिकाणाच्या तापमानाची किमान माहिती करुन घ्या आणि त्यानुसार जास्तीचे कपडे सोबत ठेवा. थंडीला पुरतील असे जास्तीचे उबदार कपडे सोबत ठेवा. सोबत वयस्कर व्यक्ती आणि लहान मुले असल्यास शालीसारखे कपडे कोणीही वापरू शकते.

हिवाळ्यात त्वचा कोरडी पडते आणि खाज सुटते. तसेच आगही होते. काहींना खाजवल्यानंतर रक्त येते. त्यामुळे कोल्डक्रीम, तेल, लीपबाम यांसारख्या त्वचेला मऊ ठेवतील अशा गोष्टी सोबत ठेवा. त्याचा निश्चितच फायदा होतो.

# सिंगल चार्जमध्ये २५ दिवस चालेल फायर बोल्ट आर्मर स्मार्टवॉच; १४९९ रुपयांमध्ये ॲमेझॉनवरून होणार विक्री

फायर बोल्ट नं स्मार्टवॉच सेग्मेंटमध्ये नवीन विअरबेल सादर केला आहे. कंपनीच्या नव्या विअरेबल फायर बोल्ट आर्मर मध्ये १.६ इंचाचा डिस्प्ले देण्यात आला आहे. ज्यात ६०० निट्स पीक ब्राइटनेस आहे. ह्यात ४०० ७ ४०० पिक्सल रिजॉल्यूशन देण्यात आलं आहे. वॉचची डिजाइन आकर्षक आहे. हा ब्लूटूथ कॉलिंग आणि बिल्ट-इन माइकसह आला आहे. चला जाणून घेऊया ह्याचे सर्व फीचर्स.





**फायर बोल्ट आर्मर ची किंमत :** फायर बोल्ट आर्मरची किंमत भारतात १४९९ रुपये आहे. हा कंपनीने ब्लॅक, कामो ब्लॅक, ग्रीन, गोल्ड ब्लॅक, आणि सिल्वर ग्रीन कलर ऑप्शनमध्ये लाँच केला आहे. स्मार्टवॉच कंपनीच्या अधिकृत वेबसाइट व्यतिरिक्त अमेजॉन ई-कॉमर्सवरून देखील विकत घेता येईल.

**फायर बोल्ट आर्मर स्पेसिफिकेशन्स :** फायर बोल्ट आर्मर मध्ये वर्तुळाकार डिस्प्ले देण्यात आला आहे. ह्यात स्क्रॅच रेजिस्टंट डिजाइन देण्यात आली आहे. तसेच फुल मेटल केस आणि ड्युरेबल ग्लास मिळते. कंपनीनं हे वॉच अनेक स्ट्रॅप कलरसह लाँच केलं आहे. फायर बोल्ट आर्मरचे स्पेसिफिकेशन्स पाहता, हा १.६ इंचाच्या डिस्प्लेसह येतो. डायल सर्क्युलर देण्यात आला आहे. ह्यात नेव्हिगेशनसाठी कंपनीनं एक मोठा क्राउन बटन दिला आहे. वॉचमध्ये ब्लूटूथ कनेक्टिव्हिटी आहे. हा इनबिल्ट मायक्रोफोन आणि स्पिकरसह आला आहे. ह्यात ब्लूटूथ कॉलिंग आणि व्हॉइस असिस्टंट फंक्शन देखील आहेत. स्मार्टवॉचमध्ये कंपनीने अनेक कलर कॉम्बिनेशन दिले आहेत, ज्यामुळे ह्याचा लुक खूप आकर्षक वाटतो.

स्मार्टवॉच अनेक प्रकारे हेल्थ मॉनिटर देखील करतो. ह्यात हेल्थ फीचर्स जसे की हार्ट रेट मॉनिटरिंग, स्लीप ट्रॅकिंग, एसपीओ २ लेव्हल इत्यादी आहेत. ह्यात १०० पेक्षा जास्त स्पोर्ट्स मोड देण्यात आले आहेत. तसेच स्मार्ट नोटिफिकेशन्स, वेदर अपडेट, कॅल्क्युलेटर, म्यूजिक, कॅमेरा कंट्रोल सारखे अनेक फीचर्स आहेत. बॅटरी लाइफ पाहता ह्यात ६००एमएएच बॅटरी आहे, ही ८ दिवसांचा बॅटरी बॅकअप देऊ शकते. ही क्लासिक मोडची बॅटरी लाइफ आहे. ब्लूटूथ कॉलिंगसह हे वॉच ५ दिवसांपर्यंत चालू शकतं. तसेच स्टँडबाय टाइम २५ दिवस आहे.

# केस पांढरे होण्यापासून रोखण्यासोबत केसगळतीही थांबवेल हा रस



**हल्ली** केस पांढरे होणे, केस गळणे ही समस्या साधारण बनलीये. व्यस्त आणि अनियमित लाईफस्टाईलमुळे केस पांढरे होणे, केस गळणे, कोंडा आणि इतर समस्या सतावतात. तसेच मोठ्या प्रमाणात केमिकलयुक्त शाम्पूचा वापर, तसेच सतत हेअर स्ट्रेटनिंग, हेअर ड्रायरचा मोठ्या प्रमाणात वापर यामुळे केसांचे आरोग्य बिघडते. केसांच्या या समस्यांसाठी कांद्याचा हा मास्क उपयोगी ठरतो. हा मास्क नियमितपणे लावल्यास १५-२० दिवसांत फरक जाणवतो.

**हेअर मास्क बनवण्याची कृती :** एका कांद्याचे चार तुकडे करुन मिक्सरवर वाटून घ्या. कांद्याच्या रसात अर्ध्या लिंबाचा रस मिसळा. हे मिश्रण केसांना लावून ३० ते ४० मिनिटे तसेच ठेवा. त्यानंतर शाम्पूने केस स्वच्छ धुवा. आठवड्यातून तीन ते चार वेळा ही कृती करा. १५-२० दिवसांत तुम्हाला फरक जाणवेल.

# शरीराला जीवनसत्व देणारे अंडे घेऊ शकते तुमचाही जीव, त्यामुळे अशी घ्या काळजी!

‘आपल्याकडे संडे हो या मंडे, रोज खा अंडे’ अशा आशयाचे एक वाक्य प्रचलित आहे. अंड्यामुळे आपली रोगप्रतिकारकशक्ती वाढते, हे जरी सत्य असले तरी अंडे खाताना थोडी काळजी घेतलेली बरी असते, नाही तर अंडी खाणे तुमच्या जीवावर बेतू शकते. त्यासाठी काय काळजी घ्यावी, हे आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.



शरीरातील जीवनसत्वांची पुर्तता अंडी करते. अंडे खाल्ल्यानंतर त्यातील जीवनसत्वांचे रूपांतर अल्बुमिनमध्ये होते. त्यामुळे शरीरातील अनेक गरजा पूर्ण होतात. सर्वसाधारणपणे दोन अंडी खाणे हे आपल्या आरोग्यासाठी फलदायी आहे. पण त्यापेक्षा जास्त अंडी खायची असल्यास डॉक्टरांचा सल्ला आवर्जुन घेतला पाहिजे.

बॉडी बिल्डिंग जे लोक करतात त्यांना जीवनसत्वांची जास्त गरज असते. पण, त्याची इतरांसाठी वेगळी गरज असल्यामुळे दोनपेक्षा जास्त अंडी खाल्ल्यामुळे सामान्य माणसाला अपाय होऊ शकतो. पोट बिघडणे, ॲसिडीटी त्याचबरोबर दीर्घकाळासाठी किडनीही खराब होऊ शकते, कारण जास्त प्रोटीन पचविण्यासाठी त्याला जास्त काम करावे लागते.

नुकताच उत्तर प्रदेशात एका तरुणाचा जास्त अंडी खाल्ल्यामुळे मृत्यू झाला होता. त्यामुळे किती अंडी खावी आणि किती अंडी खावू नयेत, यावर सध्या देशभर चर्चा सुरू झाली आहे. हिवाळ्यात अंडी भरपूर जीवनसत्वे असल्यामुळे खाल्ली जातात. ९ प्रकारचे अमीनो ॲसिड त्यात असतात. त्याचबरोबर ओमेगा ३ ही असते. दररोज दोन अंडी खाणे हे बुद्धिलाही फायदेशीर असून त्यामुळे बुद्धीचा तल्लखपणा वाढतो आणि तरतरीही वाटते.

अंडी खाणे फायद्याचे असल्याचे जगभरात झालेल्या संशोधनामध्येही आढळून आले आहे. अंडी खाण्याचा सल्ला डॉक्टरही देतात. अंडी ही स्वस्त आणि मिळायला सोपी असल्यामुळे ती सर्वसामान्यांच्या आवाक्यात आहेत. त्यामुळे ते गरीबांसाठीही चांगले खाद्य आहे. पण, कुठलीही गोष्ट चांगली असली की तिचा अतिरेक करू नये. त्याचे प्रमाण योग्य असले तरच ते फायद्याचे असते. अंड्यांच्या बाबतीतही तेच खरे असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

अंड्यांचा पांढरा भाग फॅट आणि कोलेस्टेरॉल-फ्री असतो. १०० ग्रॅम अंड्याच्या पिवळ्या भागात १६ तर पांढऱ्या भागात ११ ग्रॅम जीवनसत्व असते. प्रोटीनमुळे प्रकृती चांगली तर राहतेच त्याचबरोबर डोळे, नखे आणि कासांसाठीसुद्धा अंडे उत्तम आहार आहे. त्याचे प्रमाण फक्त योग्य असावे लागते.

# पालकांनो, मुलांना स्मार्टफोनपासून दूर ठेवा, नाहीतर ...



**सध्या** कोणतंही काम करण्यासाठी स्मार्टफोनचा वापर सर्रास होतो. शिवाय तरूण वर्गामध्ये स्मार्टफोन वापराचे प्रमाण मोठे आहे. आजची पिढी त्यांचा अर्धा दिवस सोशल मीडियावर व्यतीत करते. सतत फोन डोळ्यांसमोर राहिल्याने डोळ्यांवर त्याचे वाईट परिणाम उद्भवतात.

डोळ्यांवर सतत निळ्या रंगाचा प्रकाश पडल्यामुळे आकाली म्हातारपण येण्याची शक्यता असते. ‘एॅजिंग ॲण्ड मॅकेनिझम ऑफ डिसीज जर्नल’ मध्ये प्रकाशीत झालेल्या एका रिपोर्टनुसार ‘एलईडी’मधून निघणारा निळा प्रकाश मेंदूतील पेशी आणि डोळ्यांतील बुब्बुळांसाठी हानीकारक असतो.

संशोधकांनी काही मधमाश्यांना १२ तास निळ्या प्रकाशाच्या सानिध्यात ठेवले. कालांतराने त्या मधमाशांचे वय वेगाने वाढत असल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे या मधमाश्यांमध्ये हलचाल करण्याची क्षमता देखील कमी झाली.

त्यामुळं आपली मुलं किती वेळ फोन वापरतात याकडे पालकांची नजर असणं फार गरजेचं आहे. आताच्या जगात फोन हे महत्त्वाचं साधन असलं तरी, त्याचा वापर किती प्रमाणात करावा याची काळजी प्रत्येकाने घ्यायला हवी.